R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ११

दि. १८ डिसेंबर २०२५, वार : गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भाजपाला साथ द्या, रेणापूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही-महसूलमंत्री बावनकुळे

लातूर - महायुती शासनाने रेणापूरच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी दिला. येणाऱ्या २०४७ पर्यंत रेणापूरकरांच्या गरजा लक्षात ठेवून आपणास विकास करायचा आहे. निश्चितपणे रेणापूर विकासाचे मॉडेल तयार करून त्यासाठी विकसीत रेणापूरचा संकल्प करा भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षासह सर्व प्रभागातील उमेदवारांना बहुमतानी विजयी करून आशीर्वाद द्या रेणापूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रेणापूर येथील प्रचार सभेत दिली.




रेणापूर नगरपंचायत निवडणूकीतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभाताई आकनगिरे आणि १७ नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ रेणापूर येथील बाजार मैदानावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी सायंकाळी जाहीर सभा झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड हे होते. तर याप्रसंगी भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गणेशदादा हाके, भाजपाचे संघटन मंत्री संजय कौडगे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड, नाथसिंह देशमुख, विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे, सतीश आंबेकर, श्रीनिवास अकनगिरे, सुरज शिंदे, शरद दरेकर, विजय काळे रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह भाजपचे सर्व उमेदवार, प्रमुख पदाधिकारी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या जाहीर सभेला बाजार मैदान खचाखच भरले होते. संपूर्ण मैदान भाजपामय झाले होते त्यात महिलांची संख्या प्रचंड होती. भारतीय जनता पार्टीचा विजय असो, बावनकुळे साहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है, रमेश आप्पा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, यासह विविध गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रसरकारच्या ५५ योजना आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्यसरकारच्या ४८ योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीचा निधी आणि आपले कर्तव्यदक्ष आमदार रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंत्रालयातून रेणापूरच्या विकासासाठी भरघोस निधी आणायचा आहे असे सांगून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, रेणापूरच्या विकासाला गती देण्यासाठी भाजपाचा वचननामा पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या डबल इंजिनसोबत रेणापूरला विकासाचं तिसर इंजिन जोडा असे आव्हान केले.

ग्रामीण भागात शेत रस्त्याचा प्रश्न खूप महत्त्वाचा असून मुख्यमंत्री बळीराजा पाणंदमुक्ती रस्ता राज्य शासनाने सुरू केली असून या योजनेअंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. येणाऱ्या पाच वर्षात रेणापूरसह कुठलाही रस्ता शिल्लक राहणार नाही असे जाहीर करून ऑक्टोबर २०२४ पूर्वी जेवढी घरे झाली आहेत त्यांना सातबारा मालकी देवू तसेच सरकारी जागेवर जे लोक राहत असतील त्यांना कबाले देण्याचा निर्णय घेतला असून यामुळे एकही रुपया नं घेता काळेवाडी, संजयनगर, नेहरूनगर, सेवादास नगर यासह रेणापूर येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलून दाखविले.

शंभर वर्षानंतर प्रत्येक घराचा सर्वे करण्याचा निर्णय महायुती शासनाने घेतला असून एका घरासाठी रुपये ४ हजार खर्च येतो परंतु आम्ही एकही रुपया न घेता रेणापूर शहरातील प्रत्येक घराचे सर्वे करून प्रत्येक घराची सनद देणार आहोत अशी माहिती देऊन रेणापूर विकासाच्या गाडीत विकासाचं पेट्रोल टाकाण्यास आम्ही आहोत. या गाडीची चावी शोभाताई आकनगिरे यांच्याकडे द्या आणि जेवढा निधी पाहिजे तेवढा निधी आम्ही देवू असे अभिवचन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

लाडकी बहिण योजना आम्ही केवळ चालू ठेवणार नाही तर ती अधिक बळकट करणार आहोत असे सांगून राज्य शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. रमेशआप्पा कराड कर्तव्यदक्ष आमदार आहेत रेणापूरच्या विकासासाठी त्यांनी कोट्यावधीचा निधी आणला असे सांगून काँग्रेस पक्षाला कोणी वाली राहिला नाही, कुणाचा पायपोस कुणाला नाही, काँग्रेस पार्टी दिवाळखोरीकडे चाललेली आहे. त्यामुळे अनेकजण भाजपात प्रवेश करत आहेत. त्रिंबक भिसे यांनी काँग्रेस पार्टी सोडून भाजपात प्रवेश केला हा त्यांचा निर्णय योग्य आहे. तेंव्हा विकसित संकल्पना पुढे घेऊन जाण्यासाठी नागरिकांनी विकासाच्या बाजूने राहून भाजपाला साथ द्यावी असे आवाहन केले.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, रेणापूरचा सर्वांगिण विकास करण्याचे काम आम्ही केले. काँग्रेस पक्षाने जाती जातीत मतभेद निर्माण करण्याचे काम केले. मागील ५ वर्षाच्या काळात कॉग्रेसचे आमदार कुठे होते? असा सवाल करुन आज ते रेणापूरात गल्लोगल्ली फिरत आहेत ही निवडणूक प्रतिष्ठेसाठी नव्हे तर रेणापूरकरांच्या स्वाभिमानाची, विकासाची निवडणूक आहे. अभिषेक आकनगिरे यांच्या माध्यमातून रेणापूरचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम आम्ही केले. विकासाच्या कामात कसलाही मतभेद केला नाही. केलेल्या विकास कामाच्या आधारावर आम्ही आशीर्वाद मागतोय, विकासाची गती कायम ठेवण्यासाठी कमळ चिन्हा समोरील बटण दाबून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभाताई आकनगिरे आणि सर्व १७ नगरसेवकांना विक्रमी मतानी विजयी करावे असे आवाहन केले.

लातूर ग्रामीणमध्ये बलाढ्या नेत्याला पाडून रमेशअप्पांनी इतिहास निर्माण केला असे सांगून माजी मंत्री आ. संजय बनसोडे यावेळी म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे विकासाचं रोडमॅप आहे. आ. रमेशअप्पा कराड हे सातत्याने मंत्रालयात रेणापूरच्या विकासासाठी निधी मिळावा यासाठी धडपडत असतात. कोणताही जाती धर्माचा विचार न करता एकसंघपणे रेणापूरकरांनी विकासासोबत राहावे. सर्वांगीण हितासाठी रेणापूरच्या प्रगतीसाठी भाजपासोबत राहून रमेशअप्पा कराड यांचे हात बळकट करावेत, असे आवाहन बनसोडे यांनी केले. प्रचारसभा नव्हे तर विजयी सभा म्हणावे लागेल असे सांगून भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील म्हणाले की सभेतील गर्दी पाहून आ. रमेशअप्पा कराड यांच्या कामाची पावती मिळते, रमेश आप्पांनी रेणापूर बरोबरच संपूर्ण लातूर ग्रामीण मतदार संघात प्रचंड मोठा विकासात्मक बदल घडून आणला आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. रमेशआप्पांना साथ द्या भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आव्हान त्यांनी केले.

माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे यांनी काँग्रेसमध्ये आता विकासवादी आणि आश्वासक चेहरा राहिला नाही. भाजपकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'यांचा आश्वासक चेहरा असल्यामुळेच आ. रमेशअप्पा कराड हे विकास निधी खेचून आणण्याचे काम करत असल्यामुळे आपण भाजपात प्रवेश केला. रेणापूर नगर पंचायतीच्या निवडणूकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार यांच्यासह सर्व १७ उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन केले. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांनी धडाकेबाज भाषण करून काँग्रेसच्या कारभारावर टीका करत भाजपाच्या माध्यमातून झालेल्या कामाची माहिती दिली रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून नगरपंचायत च्या कामाची माहिती देऊन या पुढील काळात काम करण्याची संधी द्यावी असे आव्हान केले. यावेळी महिला काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष स्वाती उमेश सोमाणी, उमेश किशोर सोमाणी, आकाश पाटील, भानुदास जाधव, कृष्णा राठोड व इतर अनेकांनी भाजपात प्रवेश केला. प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या जाहीर प्रचार सभेस भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह रेणापूर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील हजारो महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा 'युनेस्को'च्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची बाब - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा युनेस्कोच्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची, ऐतिहासिक आणि जागतिक स्तरावर महत्त्वाची घटना आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवाधिकारांचे जागतिक प्रवक्ते म्हणून त्यांची ओळख आहे. शिक्षण हे यशाकडे नेणारे साधन आहे हा बाबासाहेबांचा संदेश जगभर पोहोचविण्याच्या उदात्त हेतूने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोला भेटस्वरूपात देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



युनेस्कोला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेटस्वरूपात अर्पण केल्याबद्दल युनेस्को, पॅरिस येथील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेत आभार मानले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची ही भारताच्या ८० वर्षांच्या सदस्यत्वातील पहिलीच घटना असल्याचे शर्मा यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने युनेस्कोमध्ये बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण होणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक बाब असून, या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन केले.

केंद्र शासनाच्या वतीने शर्मा यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने युनेस्कोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला युनेस्कोचे महासंचालक, ५० हून अधिक देशांचे राजदूत तसेच युनेस्को सचिवालयाचे सदस्य उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे संदेश यावेळी वाचून दाखविण्यात आले होते, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमास संबोधित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बाबासाहेबांचा समतेचा संदेश आणि शिक्षणाचे महत्त्व जगभरातील तरूणांपर्यंत पोहोचविण्याचा हा राज्य व केंद्र शासनाचा प्रयत्न होता. याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराजांचे ११ किल्ले (तामिळनाडूतील एक) असे देशातील १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे ही राज्यासाठी अत्यंत गौरवास्पद बाब असून, हा नामांकन सोहळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी शिवनेरी किल्ल्यावर भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा शासनाचा मानस आहे.

छत्रपतींचा समृद्ध वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा म्हणजेच 'लोककल्याणासाठीच राज्य' या विचाराशी सुशासनाचा संदेश जोडण्याचा प्रयत्न करण्यात यावा. तसेच दीपावलीचा अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून समावेश करताना, दिखाव्यापेक्षा त्यामागील मूल्यांचा विचार करून सुशासनाची संकल्पना पुढे नेण्याची गरज आहे.

किल्ले व वारसा आधारित विकासासाठी ५० हजारापेक्षा जास्त रोजगार तयार होईल आणि एक हजार कोटीच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडे असलेल्या प्रस्तावावर यावेळी चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, राज्य पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गारगे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच सांस्कृतिक व पुरातत्त्व विभागातील अधिकाऱ्यांशीही राजदूत शर्मा यांनी चर्चा केली. चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शर्मा भेट देणार आहेत.

## गुटखा उत्पादकांवर नवीन वर्षात मकोका लागणार अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

मुंबई, :- राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या मकोका लावण्यासाठीच्या प्रस्तावात आवश्यक त्या दुरुस्त्या कायद्यात करण्यात येणार आहेत. त्यानंतर येत्या नवीन वर्षात गुटखा उत्पादकांवर मकोका लागणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.



यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्यासाठीचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. मात्र कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरुस्त्या कायद्यात करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.

त्यानुसार नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागले आहे. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण आणणार, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती प्रस्ताव आणण्यात येणार असल्याचेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

गुटखा बंदी कायदा कठोर करण्यासाठी व मकोका लावण्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करून सुधारित प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे लवकरात लवकर पाठविण्याचे निर्देश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## महाराष्ट्राच्या व्यापार, आर्थिक, पायाभूत सुविधा आणि विकास क्षेत्रात सहभागी होण्याची संधी

मुंबई,:- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची डच परराष्ट्र मंत्री डेव्हिड वील यांनी भेट घेतली. 'वर्षा' मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या भेटीत उद्योग विभाग सचिव पी. अनबलगन, सचिव आणि राजशिष्टाचार विभागाचे प्रमुख डॉ. राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक व धोरण विषयक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. उपस्थित होते. डच शिष्टमंडळात राजदूत मोरिसा जेराड्र्स, वाणिज्य दूतावास जनरल नबिल तौआती उपस्थित होते.



या भेटीत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या संधींबद्दल चर्चा केली. तसेच व्यापार, अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकास यावरही चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सरकार आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञानाच्या वापराला पाठिंबा देत आहे. नेदरलँड्सच्या सहभागातून मत्स्यव्यवसायासारखे अनेक क्षेत्र विकसित केले जाऊ शकतात. परराष्ट्र मंत्री डेव्हिड वील यांनी प्रणाली आणि साहित्य, प्रगत यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स आणि साहित्यातील उच्च-तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या संशोधन आणि विकासात डच योगदानाबद्दल माहिती दिली.

## संपादकीय...


# एस.सी.मधील ‘अ, ब, क, ड’ आरक्षण

अन्याय झाकण्याचा डाव की खरा सामाजिक न्याय? अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे भीक नव्हे, तर शतकानुशतके झालेल्या अन्यायाची भरपाई आहे. मात्र आज या आरक्षणावरच घाव घालण्याचे काम ‘अ, ब, क, ड’ उपवर्गीकरणाच्या नावाखाली सुरू आहे. हा निर्णय सामाजिक न्यायासाठी आहे, असे सांगितले जाते; पण प्रत्यक्षात तो आरक्षणाची धार बोथट करण्याचा, दलित समाजात फूट पाडण्याचा आणि सत्ताधाऱ्यांच्या अपयशावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न वाटतो. अपयशी प्रशासनाचे खापर दलितांवर? आजपर्यंत जर आरक्षणाचा लाभ काही घटकांपुरताच मर्यादित राहिला असेल, तर त्याला जबाबदार कोण? दलित समाज की निकृष्ट शिक्षण व्यवस्था? अपुऱ्या शिष्यवृत्ती? गावागावातील जातीय भेदभाव? रोजगार निर्मितीतले अपयश? या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी तुमच्यातच आरक्षण वाटून घ्या असे सांगणे म्हणजे राज्याच्या जबाबदारीतून पळ काढण्याचा प्रकार नाही काय? ‘आरक्षणात आरक्षण’ म्हणजे सामाजिक न्याय की सामाजिक फूट? एस.सी. समाज आधीच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संघर्षात आहे. अशा वेळी ‘अ, ब, क, ड’ वर्गीकरण करून एका दलिताला दुसऱ्या दलिताच्या विरोधात उभे केले जात आहे एकत्रित संघर्षाची ताकद कमकुवत केली जात आहे आरक्षणाचा मुद्दा अंतर्गत भांडणात अडकवला जात आहे हे सामाजिक न्याय नव्हे, तर सामाजिक धोकादायक प्रयोग आहेत. खरा प्रश्न टाळला जातोय आरक्षणाचा लाभ तळागाळात पोहोचत नसेल, तर उपाय असा असायला हवा की सर्व एस.सी. घटकांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करणे पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना विशेष मदत देणे खाजगी क्षेत्रातही प्रतिनिधित्व वाढवणे पण हे कठीण प्रश्न सोडवण्याऐवजी सोपा मार्ग म्हणून वर्गीकरणाचा पर्याय पुढे केला जात आहे. इतिहास सांगतो : फूट नेहमीच सत्तेला सोयीची ठरते इतिहासात वारंवार पाहिले आहे जेव्हा वंचित समाज एकत्र येतो, तेव्हा सत्तेला प्रश्न विचारले जातात. आणि जेव्हा तो समाज विभागला जातो, तेव्हा प्रश्न गप्प होतात. ‘अ, ब, क, ड’ आरक्षण हीच ती धोकादायक वाट आहे, जिथे अन्याय संपवण्याऐवजी तो अधिक सूक्ष्म पद्धतीने कायम ठेवला जातो. निष्कर्ष : हा निर्णय सावधतेने नव्हे, तर संशयाने पाहायला हवा एस.सी.मधील उपवर्गीकरण व्यापक चर्चा न करता, समाजाचा विश्वास न घेता, आणि ठोस सामाजिक सुधारणांशिवाय राबवले गेले, तर ते दलित सशक्तीकरण नव्हे, तर दलित कमकुवतकरणाचे साधन ठरेल. आरक्षण वाचवायचे असेल, तर त्याची मुळे कुरतडणाऱ्या प्रयोगांना ठामपणे विरोध करावा लागेल. सामाजिक न्याय हा आकड्यांचा खेळ नाही तो संघर्षाचा परिणाम आहे.

# कर्मयोगी गाडगे महाराज

महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांच्या कार्याचा फार मोठा वाटा असुन त्यांनी आपल्या अभंग साहित्यातुन समतेच्या विचारांची पेरणी केली. ज्या ज्या सुधारणावादी चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या त्यांच्या मुळाशी संतांच्या विचारांचा ओलावा आहे. जेव्हा प्रबोधनाची आणि लोकजागृतीची कोणतीही साधने उपलब्ध नव्हती तेव्हा गावागावात संतांचे विचार पोहचविण्याचे काम कीर्तनकारांनी केले. नामदेव महाराजांनी नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी असे जे म्हटले होते त्यांचा वसा आणि वारसा चालवून समाजाला जागृत करण्याचे काम अनेक कीर्तनकारांनी केले. त्यामध्येच संत गाडगे महाराजांचा उल्लेख करावा लागेल.

अमरावती जिल्ह्यात शेणगाव या ठिकाणी गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांचे लहानपणीचे नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर. त्यांच्यावर संत तुकाराम, संत कबीर यांचा विशेष प्रभाव होता. महाराजांचा वेश हातात एक काठी, डोक्यावर फुटके मडक्याचे खापर, एका कानात कवडी तर दुसऱ्या कानात काचेच्या बांगडीचा तुकडा, अंगावर अनेक चिंध्या जमा करून त्याचा शिवलेला सदरा. अशा अवतारामुळे त्यांना कोणी गाडगे महाराज, गाडगेबाबा, गोधडे बुवा म्हणत. गाडगे महाराज निरक्षर परंतु जे का रंजले गांजले त्यासी आपले म्हणणारे. अनुभव आणि निरीक्षणाच्या आधारे त्यांनी येथील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अस्पृश्यता आणि अनारोग्याच्या अंधारात खितपत पडलेल्या असंख्य गोरगरीब जनतेला ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराच्या वाटा दाखवल्या. कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या जाणिवा जागृत केला. दिवसा खराट्याने गाव झाडून स्वच्छ करायचा आणि रात्री कीर्तनाद्वारे लोकांच्या डोक्यातील अज्ञानरूपी घाण नाहीशी करायची हा सेवा धर्म त्यांनी अंगीकारला. गाडगे महाराज त्यांचे विचार अगदी सहज सोप्या भाषेत समजावून सांगायचे.



देवळात देव नाही, जात-पात मानू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, लग्नकार्यात वायफळ खर्च करू नका, मुक्या जनावरांचा बळी देऊ नका, नवस, सत्यनारायण, जादूटोणा, देवभगत यांच्या नादी लागू नका. आपल्या लेकराला शाळेत घाला. शिक्षणासाठी पैसे नाहीत म्हणू नका. वेळप्रसंगी जेवणाचे ताट मोडा, हातावर घेवून भाकर खा पण लेकरांना शिक्षण द्या. सार्वजनिक स्वच्छता हा गाडगे महाराजांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. श्रमप्रतिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनता जनार्दनाच्या आणि दरिद्री नारायणाच्या सेवेत घालविले. अस्पृश्यता त्यांनी नाकारली. ते म्हणायचे सर्वांचे धरती, आकाश, नदी एक, सर्वांना दोन हात, दोन पाय सारखे असताना अस्पृश्यता आणि जातपात मानायचे काय कारण. स्त्री आणि पुरुष या दोन जाती आणि मानवता हा धर्म ते मानायचे. दगडातला देव त्यांनी नाकारला. भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा, बेकारांना काम, दुःखी व निराशांना हिंमत, गरीब मुला-मुलींना शिक्षण, गरीब तरूण-तरूणींचे लग्न, अंध-पंगु रोग्यांना औषध, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना अभय हाच रोकडा धर्म आणि हिच देवपुजा ते मानायचे. मी कोणाचा गुरू नाही व माझा कोणी शिष्य नाही असे म्हणून गुरुशिष्य परंपरा त्यांनी नाकारली. ते केवळ बोलघेवडे संत नव्हते. त्यांच्या आचार आणि विचारात एक वाक्यता होती. त्यांनी निस्पृह आचरण आणि स्थितप्रज्ञ भाव ठेवून शेकडो लोकोपयोगी संस्था स्थापन केल्या. त्यामुळे ते खरे कृतिशील संत आणि समाजसुधारक होते. कुठल्याही संस्थेत माझा किंवा माझ्या नातेवाईकाचा सुतळीच्या तोड्यावर ही अधिकार नाही. कोणी अधिकार सांगत असेल तर त्याला हाकलून लावा. असा निस्पृह भाव ठेवून विश्वस्ताचा सिद्धांत त्यांनी प्रत्यक्षात आणला. प्रेम, करुणा, सेवा याचा अंगीकार करून, प्रत्येक माणूस हेच एक परमेश्वराचे देऊळ असून माणसाची सेवा हीच ईश्वराची पूजा आहे असा त्यांचा भाव होता. त्यांनी त्यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकजीवनाला अनौपचारिक शिक्षणाची शाळा केली होती. म्हणून ते एक चालते बोलते लोकविद्यापीठ होते. औपचारिकपणे ‘कीर्तनात गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला’ हे भजन म्हणायचे परंतु लोकशिक्षण हा कीर्तनाचा मुख्य उद्देश आणि सशक्त व बलशाली भारत हे ध्येय होते. त्यांचे जीवन म्हणजे लोक विकासाची चळवळ झाली. त्यांच्या कार्याचा आदर्श घेवून अनेक निस्वार्थी कीर्तनकार व अनेक धर्मशाळेत काम करणारे सेवेकरी तयार झाले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, डॉ. पंजाबराव देशमुख, मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे या सर्वांसोबत ‘एकमेका सहाय्य करू’ या न्यायाने ते अखंड न थकता कर्मयोगी म्हणून जगले. दारूबंदी प्रचार कार्यासाठी शासनाने त्यांना एक मोटारगाडी दिली होती. ‘संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान’ या नावाने पुरस्कार देवून तसेच अमरावती विद्यापीठास ‘संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ’ असे नाव देवून त्यांच्या कार्याचा गौरव शासनाकडून करण्यात आला. त्यांचे देहावसान २० डिसेंबर १९५६ रोजी झाले. त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन.

**जगन्नाथ विठ्ठलराव कदम**
**संशोधक विद्यार्थी**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.**
**९४२०८८१०१२**

# आजच्या काळात लोकशाहीची परिभाषा

माणसाला उर्जावान होण्यासाठी अन्न लागते आणि बुद्धीची उन्नती करण्याससाठी विचार लागतात. आधुनिक काळाकडे घेऊन जाणारे विचार इथे आहेत, म्हणूनच आज तरी विविध प्रांतातील लोक, विविध जाती समूहातील लोक या आधुनिक विचारधारेकडे आकर्षित होत आहेत, त्यांची संख्या दिवसा गणिक वाढत चालली आहे. ही माणसं अशा ठिकाणाहून येतात जिथे ज्ञानाचा आणि वैचारिक क्रांतीचा अभाव असतो. समतेच्या या महापरिवर्तनात सामाहून घेण्यासाठी आणखी व्यापक परिवर्तन करू इच्छिणाऱ्यांकडे नवी आधुनिक अशी कालसुसंगत दृष्टी असली पाहिजे. ती राजकारणी लोकांकडे असणे शक्यच नाही तर ती वैचारिक लेखन करणाऱ्या लेखकांच्या मांडणीतून आली पाहिजे.

आजच्या संदर्भात विचार करताना गौतम बुद्धांनंतर निर्माण झालेल्या सर्व ईश्वरवादी धर्मांमध्ये भौतिक अशी ओळख आहे आणि त्यांच्या प्रार्थनेची ठराविक वेळ आहे. माझे काही मित्र आपल्यात तसा काही प्रकार का नाही? असा सातत्याने टाहो फोडत असतात. अर्थात आपणाला किंवा आपल्या आदर्शांनी संकलीत केलेल्या समतेला अशा भौतिक ओळखपत्राची गरज का असावी? याचे उत्तर असे देता येईल की, आपणही त्यांच्याप्रमाणे प्रवाह पतितच आहोत आपली परिवर्तनासोबत किंवा वैचारिक क्रांती सोबतची ओळख नवी आहे. ती मागील दोन-चार पिढ्यांपेक्षा मोठी नाही. आणि आपल्या भावविश्वातून रिक्त होणाऱ्या जागा आपण आणि आपली माणसं इतर भौतिक कृतीद्वारे भरून काढत आहेत. नदीच्या किनाऱ्यावरून किंवा आजूबाजूला शेती करणारे शेतकरी समृद्ध असतात. अनेक दृष्टीने, परंतु आपण फुले-आंबेडकर विचारधारेत असूनही आपण वैचारिक क्रांतीद्वारे समृद्ध का होत नाही ? असा प्रश्न बुद्धीवंताच्या अंतरंगात सातत्यपूर्वक येतो त्याला काय करणार ?

स्वातंत्र्याची परिभाषा ही आपल्या देशातील जातीबद्ध अशा पारंपरिक जीवन पद्धतीला परकीय ठरणारी आहे. खऱ्या अर्थाने पाहिले तर स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचं नातं अतूट असतं. उदाहरणार्थ जे लोक आणि देश स्वतंत्र असतात तिथेच खऱ्या अर्थाने लोकशाही नांदू शकते. परंतु जिथे पारतंत्र्य वसत असते, तिथे लोकशाही अवतरुच शकत नाही. त्याचे कारण असे आहे की, लोकशाही प्रणाली ही नेहमी लोकांची, लोकांकडून आणि लोकांसाठी असावी लागते आणि तिचा उपभोग तेच घेऊ शकतात जे स्वतंत्र असतात. म्हणजे एखादा देश स्वतंत्र असला तरी त्यातील नागरिक गुलाम असू शकतात. देशाच्या भौगोलिक परिसीमा पारतंत्र्यातून मुक्त होणे एवढाच स्वातंत्र्याचा अर्थ आहे काय ? अर्थातच देशातील नागरिक खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणे आणि त्यांनी त्याचा उपभोग घेणे. लोकशाही प्रणालीतील अभिप्रेत असलेला स्वातंत्र्याचा हा व्यापक अर्थ आपल्या भारतीय लोकशाहीने आत्मसात केला आहे काय ?

म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याची संकल्पना आणि मानवी स्वातंत्र्याची संकल्पना याबाबतची व्याख्या आपण खऱ्या अर्थाने मांडून पाहिली पाहिजे. राजकीय स्वातंत्र्या पूरतीच लोकशाहीची मर्यादा असू शकत नाही तर माणसाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा फार मोठा प्रश्न आपल्या देशाच्या सर्वच भौगोलिक भागांमध्ये रात्रंदिवस खदखदतोय. याचा अभ्यास पूर्ण विचार समाजपरिवर्तन करू पाहणाऱ्या नेतृत्वाने करायला पाहिजे ते त्यांचे कर्तव्यच आहे.

आपल्या भारतीय लोकशाहीने राजकीय लोकशाहीचा पेहराव परिधान केलेला दिसेल. परंतु तिचे रुपांतर सामाजिक आणि आर्थिक क्रांतीमध्ये झाल्याचे स्वरुप आपणाला दिसते काय? ही वस्तुस्थिती कोणत्याही डोळस माणसाला नजरे आड करुन चालणार नाही. लोकशाहीचा विपर्यास आपल्याला कुठे पहायला मिळतो. तो राजकीय समृद्धी दिसते परंतु सामाजिक आणि आर्थिक दिसत नाही. म्हणजे राजकारणात पुरोगामी समाजकारणात प्रतिगामी अशी एकूण परिस्थिती झालेली आपणाला पहायला मिळते. स्वातंत्र्याच्या गेल्या कित्येक वर्षात जातीचे वास्तव आणि स्वरुप काडीमात्र बदलले नाही. विविधतेत एकता शोधू पाहणाऱ्यांसाठी खरे तर ते बिन चेहऱ्याचे समूह आहेत. त्यांना वाट दाखवणारा वाटाड्या त्यांच्याजवळ नसल्याने आजच्या आधुनिक काळात त्यांची परिस्थिती वाईट आहे. उदाहरणार्थ ब्राम्हणांमध्ये व्हॉल्टेअर नाही आणि भारताच्या जातीजाती मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाहीत. अशी एकूणच गत मानवतेच्या लढ्याची झाली आहे. परिवर्तनाचा मार्ग मेंदूतून जात असला तरी शतकानुशतकांच्या अज्ञानातून जपून ठेवलेला कचरा फेकून देणे आज तरी सामान्य माणसाला शक्य होत नाही. मानवाच्या उत्क्रांती प्रवासात प्रत्येक काळात तो उन्नत झाला तरी धर्मान-परंपरेने त्याच्या डोक्यावर ठेवलेला बोजा त्याला दूर सारता आलेला नाही, माणसाला जिज्ञासू होण्यासाठी तेवढ्या दर्जाचे सांस्कृतिक वातावरण लागतं त्यातून त्याच्या जिज्ञासेला हजारो बाजूंनी पंख फूटू लागतात.

**अरूण वाघ**
**+९१ ९२२३२ ०३५४५**

# माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा !






मराठवाडा संतांची, वीरांची भूमी आहे. याच भूमीतील नांदेड जिल्ह्यात माळेगाव आहे. लोहा तालुक्यातील या गावात मोठी यात्रा भरते. ही यात्रा मार्गशीर्ष अमावास्येला सुरू होते. दक्षिण भारतात ही यात्रा अत्यंत प्रसिद्ध आहे. माळेगाव केवळ धार्मिक स्थळ नाही. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारे मोठे व्यापारी केंद्र आहे. या यात्रेला आजपासून (ता. १८ ते २५ डिसेंबर) सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने या यात्रेवर प्रकाश टाकणारा हा लेख.

माळेगाव यात्रेला जवळपास चार शतकांची परंपरा आहे. मोगल, निजाम काळापासून या यात्रेला अनन्य साधारण महत्त्व आहे. ऐतिहासिक काळापासून माळेगाव घोड्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. आजही तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील व्यापारी येथे येतात. या ठिकाणी महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाचे देखणे, सुंदर असे मंदिर आहे.

माळेगाव यात्रा म्हणजे लोककलांचे माहेरघर. येथे कलगी-तुरा, वाघ्या-मुरळी, गोंधळ आणि भारूड सादर होतात. तमाशा, लावणी येथील मुख्य आकर्षण असते. नामांकित तमाशा फडांची जुगलबंदी येथे रंगते. तमाशासोबतच ‘मौत का कुआँ’ सारखे प्रकारही येथे दिसतात.

इतर यात्रांमध्ये प्रामुख्याने फक्त देवदर्शन असते. पण माळेगाव यात्रा वेगळी आहे. येथे कृषी प्रदर्शन आणि कुस्त्यांची दंगल पाहायला मिळते. पशु प्रदर्शन या यात्रेचे हृदय आहे. येथे हजारो जनावरांची खरेदी-विक्री होते. राजस्थानच्या पुष्कर मेळ्यानंतर घोड्यांच्या व्यापारासाठी ही दुसरी मोठी बाजारपेठ आहे. यात्रेत सर्वधर्मीय लोक आनंदाने सहभागी होतात. ही यात्रा म्हणजे उत्तम, असे सामाजिक सलोख्याचे प्रतीकच आहे.

माळेगाव यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाच ते सात दिवसांतच येथे कोट्यवधींची उलाढाल होते. चेतक, मारवाडी, पंजाबी अशा उच्च जातीचे घोडे विक्रीला येतात. या घोड्यांची खरेदी-विक्री किंमत चकित करणारी असते. यासह येथे गाढवांचीही मोठी बाजारपेठ भरते. वीटभट्टी व्यावसायिक आणि परराज्यातील व्यापारी येथे गाढवे खरेदी करतात. याशिवाय उंट, बैल, गायी आणि शेळ्या-मेंढ्यांचीही विक्री होते. कृषी अवजारे आणि खाद्यपदार्थांचीही मोठी उलाढाल होते.

अडचणीच्या काळात ही यात्रा शेतकऱ्याला आधार देते. पशुधन विकून आलेला पैसा शेतीसाठी वापरला जातो. यात्रेत शेतकऱ्यांना नवीन बियाणे आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळते. तसेच यात्रेतून स्थानिक मजुरांना रोजगार मिळतो. पूर्वी यात्रेत कृषी विषयक वस्तूंची देवाण-घेवाण (इर्शीशी ड्रिंशी) होत असे. आता रोखीने आणि ‘युपीआय’द्वारे (जपश्रळपश) व्यवहार होतात. पूर्वी बैलगाडीतून येणारे भाविक चारचाकी गाड्यांमधून येतात.

माळेगावची ही यात्रा केवळ उत्सव नाही. ती ग्रामीण संस्कृतीची एक प्रयोगशाळा आहे. आधुनिकीकरणाच्या काळातही यात्रेने आपली ओळख जपली आहे. हजारो हातांना काम देणारी ही यात्रा खऱ्या अर्थाने ‘वैभवशाली’ अशीच आहे.

**डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर




छत्रपती संभाजीनगर (विमाका) गावातील पाणीपुरवठा योजना, पाणंद रस्ते, अंगणवाडी व शाळा इमारती, स्मशानभूमी, घरकुल तसेच सौर ऊर्जेच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांच्या अडचणी तत्काळ सोडवाव्यात. ग्रामविकास प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून प्रशासकीय यंत्रणांनी ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी व वेळेत अंमलबजावणी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यांतील निवडक गावांमधील नागरिकांशी 'ई ग्रामसंवाद  एक दिवस' उपक्रमांतर्गत ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधला. या वेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहायक आयुक्त ज्ञानोबा मोकाटे उपस्थित होते. संवादात संबंधित गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्री. पापळकर म्हणाले की, गावातील पाणीटंचाईच्या नियोजनात पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी तत्काळ सोडवून त्यामध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता गावपातळीवरील प्रशासकीय यंत्रणांनी घ्यावी. जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, अंगणवाडी सुविधा तसेच प्रत्येक गावात सुविधायुक्त स्मशानभूमी उपलब्ध असणे गरजेचे आहे. ज्या गावांमध्ये या सुविधा उपलब्ध नाहीत, तेथे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने तातडीने पाठपुरावा करावा. गावात एकही कुटुंब बेघर राहणार नाही, यादृष्टीने प्रशासनाने नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

संवादादरम्यान बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील नफरवाडी, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील हादगाव, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी तसेच लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील नागरिकांनी त्यांच्या गावांतील विविध समस्या मांडल्या. विभागीय आयुक्तांनी संबंधित प्रशासनाला या अडचणी तत्परतेने सोडवून त्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांतील नागरिकांनी या संवादात सहभाग नोंदविला. दर पंधरवाड्याला प्रत्येक जिल्यायातून एक गाव निवडून तेथील  नागरिकांशी थेट हा संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमामुळे गावातील प्रश्न समजण्यास मदत होते. योजनांचाही आढावा प्रभावी ठरतो.

# भारत-रशिया व्यापार सहकार्याला चालना देणारी उद्योजकांची राऊंडटेबल चर्चा संपन्न




मुंबई :- वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (एआयएआय) यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे रशियातील व्यावसायिक प्रतिनिधी मंडळासोबत संवादात्मक बैठक (इंटरक्टिव्ह राऊंडटेबल मीटिंग) आयोजित करण्यात आली. या परिषदेमुळे भारतीय उद्योगांना रशियन कंपन्यांशी थेट संवाद साधण्याची, सहकार्याच्या संधी शोधण्याची आणि दीर्घकालीन व्यापार भागीदारी निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली.

या परिषदेस वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष तथा ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री, रशियातील दक्षिण निर्यात सहाय्यता केंद्राच्या प्रतिनिधी इरिना मलाहोवा, वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या ट्रेड प्रमोशन आणि डेव्हलपमेंट संचालक प्रिया पानसरे तसेच उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. विजय कलंत्री म्हणाले की, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत दौऱ्यानंतर उभय देशांतील व्यापार संबंधांना नवे बळ मिळाले आहे. त्याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला रशियन व्यापार प्रतिनिधींकडून सकारात्मक आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. भारतात विशेषतः महाराष्ट्रात व्यापाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. भारतीय भांडवली बाजारातील रशियन गुंतवणूक, अणू व संरक्षण क्षेत्रातील अत्यावश्यक तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि संयुक्त उपक्रम यांमुळे २०२७ पर्यंत द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

इरिना मलाहोवा म्हणाल्या, भारत आणि रशिया यांच्यात दीर्घकाळापासून दृढ आर्थिक व व्यापारी भागीदारी आहे. ही भागीदारी अधिक मजबूत करणे आणि रशियन उद्योगांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश सुलभ करून देणे तसेच निर्यात प्रोत्साहन व व्यवसाय संधी देणे हा परिषदेचा मुख्य उद्देश असून रशिया आणि भारत यांच्यात फलदायी द्विपक्षीय संबंध निर्माण होतील. त्यांनी यावेळी रशियातील व्यापार व निर्यात संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या परिषदेमुळे भारतरशिया व्यापार संबंध अधिक मजबूत होतील तसेच भारतीय उद्योगांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. परिषदेदरम्यान दोन्ही देशांतील उद्योजकांनी विविध क्षेत्रांतील धोरणे, संधी, आव्हाने आणि भविष्यातील सहकार्याबाबत सखोल चर्चा करत परस्पर संवाद साधला.

या परिषदेत भारतातील अन्न व पेय (एफ अँड बी), आतिथ्य (हॉस्पिटॅलिटी), किरकोळ (रिटेल), कोल्ड-चेन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उभय देशांतील विविध क्षेत्रांतील उद्योग प्रतिनिधींमध्ये सखोल चर्चा झाली. या परिषदेत १५० हून अधिक उद्योजक सहभागी झाले होते. रशियन शिष्टमंडळासाठी संरचित बी टू बी बैठका आयोजित करण्यात आल्या. यावेळी प्रिया पानसरे यांनी आभार मानले.

# बहुराष्ट्रीय जबील कंपनीकडून आयटीआयमध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स प्रशिक्षण; विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान शिकण्याची संधी



मुंबई:- अमेरिकास्थित बहुराष्ट्रीय जबील कंपनीने महाराष्ट्रातील काही निवडक आयटीआयमध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स प्रशिक्षणासाठी पुढाकार घेतला आहे. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील जबील कंपनीच्या शिष्टमंडळाने कौशल्य विकास मंत्री  मंगलप्रभात लोढा यांची मंत्रालयातील दालनात भेट घेतली. यावेळी कंपनीने महाराष्ट्रातील आयटीआय संस्थेत इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमांसाठी अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील तरुणांच्या उज्वल भवितव्यासाठी कंपनीला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मंत्री लोढा यांनी यावेळी दिले.

तरुणांना रोजगाराभिमुख आणि स्वयंरोजगारासाठी प्रेरित करण्यासाठी मुख्यमंत्री  देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभाग विविध उपक्रम राबवत असल्याचे मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले. याच अनुषंगाने जगभरातील नवे नवे तंत्रज्ञान आयटीआयच्या विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न असल्याचेही मंत्री लोढा म्हणाले. जबील कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला तसेच कंपनीच्या मनुष्यबळ विभागाचे प्रमुख गुंडूराव पाटील यांच्यासोबत झालेल्या चर्चेत निवडक आयटीआय संस्थांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमांसाठी अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करणे, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रासाठी इंडस्ट्री रेडी संकल्पनेनुसार कौशल्य प्रशिक्षण देणे तसेच समकक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे या मुद्द्यांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जबील कंपनीला आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच राज्यभरात व्यापक प्रमाणावर रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी अन्य कंपन्यांचाही सहभाग वाढवण्यासाठी विभाग प्रयत्न करेल असेही मंत्री लोढा यांनी यावेळी स्पष्ट केले. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थींना अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण मिळणार असून त्याचा भविष्यात मोठा लाभ होणार आहे. या बैठकीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यांनी आयटीआयमध्ये सध्या सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती जबील कंपनीच्या शिष्टमंडळाला दिली.

# लोकसेवा हक्क अधिनियमाची संवेदनशीलतेने अंमलबजावणी करा  राज्य सेवा हक्क आयुक्त एन रामबाबू यांचे निर्देश




बुलढाणा, (जिमाका) : लोकसेवा हक्क अधिनियमाची संवेदनशीलतेने अंमलबजावणी करावी, असे  निर्देश राज्य सेवा हक्क आयोग, अमरावतीचे आयुक्त एन. रामबाबू यांनी विभाग प्रमुखांना दिले.

आयुक्त एन. रामबाबू हे बुधवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असतांना त्यांनी विविध विभागांच्या लोक सेवांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशीव शेलार आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोकोपयोगी सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या सेवांचा लाभ लोकांपर्यंत पोहोचला पाहिजेत. लोकांच्या कर रुपी प्राप्त पैशांतून शासनाकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतन मिळते. त्यामुळे लोकांना सेवा पुरविणे ही प्रशासनाची जबाबदारी असून ती नैतिक जबाबदारी समजून लोकांना शासकीय सेवांचा लाभ द्यावा, असेही आयुक्त एन रामबाबू यावेळी म्हणाले.

शासकीय विभागातील सुधारणांविषयी आढावा प्रशासनात काम करत असतांना कार्यालय किंवा विभागातील सुधारणांविषयी आयुक्त एन रामबाबू यांनी आढावा घेतला. विभागाच्या योजना, कार्यप्रणाली आदी सुधारणांविषयी आपआपल्या विभागांना प्रस्ताव पाठवावा, असे आवाहन देखील आयुक्त एन रामबाबू यांनी अधिकाऱ्यांना केले.

# लातूर शहर महानगरपालिका निवडणूक प्रत्येक तीन प्रभागांसाठी स्वतंत्र निवडणूक निर्णय अधिकारी व कार्यालय निश्चित



लातूर :लातूर शहर महानगरपालिकेच्या येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रशासनाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. शहरातील प्रत्येक तीन प्रभागांसाठी एक निवडणूक निर्णय अधिकारी व तीन सहाय्यक निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांची स्वतंत्र कार्यालयेही निश्चित करण्यात आली आहेत.

महानगरपालिकेत एकूण १८ प्रभाग असून ७० नगरसेवकांची निवड होणार आहे. उमेदवारांना अर्ज दाखल करणे, अर्जांची छाननी, निवडणूक चिन्ह वाटप तसेच उमेदवारी माघार घेणे आदी सर्व प्रक्रिया संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातच कराव्या लागणार आहेत.

प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व कार्यालये

प्रभाग १, २, ३ : शरद झाडके (उपजिल्हाधिकारी, निलंगा)

कार्यालय : क्षेत्रीय कार्यालय 'सी', डालडा फॅक्टरी कम्पाऊंड, लातूर

प्रभाग ४, ५, ६ : मंजूषा लटपटे (उपजिल्हाधिकारी, अहमदपूर)

कार्यालय : समाजकल्याण कार्यालय, शिवनेरी गेट क्र. १ समोर, लातूर

प्रभाग ७, ८, ९ : रोहिणी नन्हे (उपजिल्हाधिकारी, लातूर)

कार्यालय : उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील समोर, लातूर

प्रभाग १०, ११, १२ : अविनाश कोरडे (उपविभागीय अधिकारी, औसारेणापूर)

कार्यालय : जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक, लातूर

प्रभाग १३, १४, १५ : सुशांत शिंदे (उपविभागीय अधिकारी, उदगीर)

कार्यालय : क्षेत्रीय कार्यालय 'अ', नंदी स्टॉप पाणी टाकी, औसा रोड, लातूर

प्रभाग १६, १७, १८ : संदीप कुलकर्णी (उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन)

कार्यालय : क्षेत्रीय कार्यालय 'ब', ठाकरे चौक, विवेकानंद हॉस्पिटलच्या पाठीमागे, लातूर

ही माहिती १७ डिसेंबर २०२५ रोजी महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त श्रीमती मानसी यांनी दिली. यावेळी रोहिणी नऱ्हे उप जिल्हाधिकारी लातूर,  उपायुक्त  डॉ. पंजाबराव खानसोळे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी सदाशिव कोलगणे तसेच माहिती व जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे आदि उपस्थित होते.

# दर्शवेळा अमावस्या निमित्त लातूर जिल्ह्यात १९ डिसेंबर रोजी स्थानिक सुट्टी

लातूर (जिमाका) : जिल्ह्यासाठी २०२५ मधील तीन स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी २० जानेवारी, २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार जाहीर केल्या आहेत. १९ डिसेंबर २०२५ (शुक्रवार) रोजी दर्शवेळा अमावस्या निमित्त जिल्ह्यात स्थानिक सुट्टी राहणार आहे.

लातूर जिल्ह्यातील उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील कार्यालये, केंद्रीय कार्यालये, केंद्रीय प्रशासनातील कार्यालये व बँकेच्या कक्षातील कार्यालये वगळता लातूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदेच्या कक्षेतील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, जिल्ह्यातील कोषागारे, महामंडळाची कार्यालये व इतर सर्व खाजगी शैक्षणिक संस्था यांना ही सुट्टी लागू राहील.

# मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे बालविवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती

लातूर, : बालविवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र शासनाचे महिला व बाल विकास मंत्रालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या जागरूकता, आधार, मदत व कृती मोहिमेअंतर्गत लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक एस.जी. मुंडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे, चाईल्ड लाईनचे जिल्हा समन्वयक बापू सुर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक तथा दामीनी पथक प्रमुख आरती पवार, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी, पालक यावेळी उपस्थित होते. तसेच न्यायरक्षक कार्यालयाचे ॲड. ए.जे. तिवारी, ॲड. सुमेधा शिंदे, ॲड. एस. व्ही. सलगरे, ॲड. ए.बी. कलशेट्टी तसेच अधिकार मित्र पार्वती सोमवंशी यांचीही यावेळी उपस्थिती होती.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव श्री. गिरवलकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना बालविवाहाचे दुष्परीणाम, तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बाल संरक्षणाबाबत अस्तित्वात असलेल्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. तसेच समाजात बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. गिरवलकर यांनी केले. बालविवाहास मुलांनी नकार द्यावा व स्वतःचे हक्काचे संरक्षण करणे बाबत विद्यार्थ्यांनी शपथ घ्यावी, असे ते म्हणाले.

## दयानंद विज्ञानमध्ये ब्रुस एम्स यांची जयंती साजरी



लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ डिसेंबर २०२५ रोजी सुप्रसिद्ध अमेरिकन जैवरसायनशास्त्रज्ञ व जनुकशास्त्रज्ञ ब्रुस ऐम्स यांची ९७ वी जयंती दयानंद एज्युकेशन सोसायटीचे अॅकॅडमिक डेव्हलपमेंट ऑफिसर (एडीओ) डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेद्घाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नीट कोऑर्डिनेटर डॉ.कोमल गोमरे यांच्या पुढाकारातून साजरी करण्यात आली.यावेळी विभाग प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी महान वैज्ञानिकांच्या संशोधनकार्याची ओळख करून देणे,विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन विकसित करणे आणि महाविद्यालयाचा शैक्षणिक लौकिक वृद्धिंगत करणे या उद्देशाने हा उपक्रम सुरू ठेवला आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विभागाप्रमुख प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी ब्रूस एम्स यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून केली.यानंतर प्रा. तृप्ती सोनकांबळे यांनी ब्रूस एम्स यांच्या जीवनप्रवास व संशोधनातील महत्त्वपूर्ण टप्प्यांचा माहितीपूर्ण आढावा सादर केला.

ब्रूस एम्स (जन्म : १६ एप्रिल १९२८) हे ऐम्स चाचणीचे जगप्रसिद्ध जनक म्हणून ओळखले जातात. ही चाचणी रासायनिक पदार्थांचे म्युटाजनीक व कार्सीनोजनीक पोटेन्शील तपासण्यासाठी सूक्ष्मजीवशास्त्र,जनुकशास्त्र व विषविज्ञान क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोग संशोधन, पर्यावरणीय आरोग्यशास्त्र तसेच जनुकानमधील बदल अभ्यासाला नवी दिशा मिळाली. तसेच पोषणतत्त्वांची कमतरता व डिएन नुकसान यांमधील संबंध स्पष्ट करण्यामध्येही त्यांचे मोलाचे योगदान आहे.या कार्यक्रमास प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## दयानंदच्या उन्नती चामेची भारत अंतराळ शिक्षण संशोधन केंद्र येथे डिफेन्स-स्पेस टेक इंटर्न म्हणून निवड



लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इयत्ता बारावीत शिक्षण घेत असलेली उन्नती बालाजी चामे या विद्यार्थीनीची भारत अंतराळ शिक्षण संशोधन केंद्र येथे डिफेन्स-स्पेस टेक इंटर्न म्हणून निवड झाली आहे.भारत स्पेस एज्युकेशन रिसर्च सेंटर ऑनलाईन डेफ-स्पेस हिवाळी इंटर्नशीप टेक्निकल ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत तिला संधी मिळत आहे.दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी ओरिएंटेशन सत्रासाठी अंडरस्वाक्षरीकृत भारत स्पेस एज्युकेशन रिसर्च सेंटरमध्ये ती हजर राहणार आहे.तिच्या इंटर्नशिपचा कालावधी दि.१९ डिसेंबर २०२५ ते १९ जानेवारी २०२६ पर्यंत असणार आहे. तसेच बीएसईआरसीच्या आउटरीच डेफ-स्पेस हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रमात ती मौल्यवान योगदान देणार आहे.याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेद्घाळे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

यावप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,डॉ.वैशाली पाटील,प्रा.मनीषा बाजपाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



बीड/प्रतिनिधी-संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज सामाजिक प्रतिष्ठान व संत संताजी जगनाडे महाराज क्रीडामंडळ, रविवार पेठ, तेली गल्ली, बीड यांच्या वतीने बुधवार दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तेली रविवार पेठ, तेली गल्ली येथे श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम श्रद्धा व उत्साहात पार पडला. तसेच जि. प. प्राथमिक शाळा, पांगरबावडी येथेही पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जि. प. प्राथमिक शाळा पांगरबावडीचे शिक्षक व कर्मचारीवर्ग तसेच संस्थेचे मान्यवर चंद्रकांत वामने, गणेश पवार, शिवाजी झांबरे, राजू चेके, दिलीप मुळे, मनोज क्षीरसागर, अंकुश शेनकुडे, हर्षद क्षीरसागर, नंदकिशोर पवार, दीपक क्षीरसागर, अनंत गोरे यांच्यासह समस्त तेली समाज बांधव व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमादरम्यान शिक्षक व मान्यवरांनी संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, शिक्षणाचे महत्त्व व संस्कारांचे महत्त्व याबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले.

# भाजपच्या शोभा आकनगिरे यांना जनसमर्थन सेवादास नगर तांड्यावरील मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा

रेणापूर /प्रतिनिधी :रेणापूर नगर पंचायत निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या भाजपच्या उमेदवार श्रीमती शोभाताई शामराव आकनगिरे यांना मतदारातून प्रचंड जनसमर्थन मिळत आहे. बुधवारी सेवादास नगर तांड्यावर मतदारांकडून हाच अनुभव आला. तांड्यातील अबाल वृद्धांनी श्रीमती आकनगिरे यांना पाठबळ व्यक्त करत निवडून आणण्याचा निर्धार केला.

नगरपंचायत निवडणुकीत सर्वच प्रभागात श्रीमती आकनगिरे यांना मतदारांकडून पाठबळ मिळत आहे. बुधवारी प्रभाग क्रमांक ३ मध्ये त्यांचा प्रचार दौरा संपन्न झाला. यावेळी पदयात्रा काढून श्रीमती शोभाताईंनी मतदारांशी चर्चा केली, संवाद साधला.

श्रीमती आकनगिरे यांचे तांड्यावरील नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पहार घालून स्वागत केले.सेवादास नगर तांड्यातील आजपर्यंत झालेली विकासकामे पाहता यापुढेही आम्ही भाजपच्याच



पाठीशी उभे राहणार असल्याचे स्पष्टपणे सांगितले.या तांड्याकडे कोणीही लक्ष देत नव्हते परंतु मागील काळात नगरपंचायतीत भाजपची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने ताड्याचा विकास झाला. तांड्याचे रूपडे पालटण्याचे काम भाजपकडून करण्यात आले. पक्के रस्ते झाले. प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ नागरिकांना मिळाला. यामुळे प्रत्येकाला हक्काचे पक्के घर मिळाले आहे. भविष्यात विकास साधून घेण्यासाठी आम्ही भाजपाच्या पाठीशी राहणार आहोत.

या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी व नगरसेवक पदासाठीही भाजपच्याच उमेदवाराला मतदान करणार असल्याची ग्वाही सेवादास नगर तांड्यावरील नागरिकांनी श्रीमती शोभाताई आकनगिरे यांना दिली.

स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या काळापासून बंजारा समाज भाजपच्या सोबत आहे. विधानसभा निवडणुकीत आ.रमेशअप्पा कराड यांच्या पाठीशी आपली ताकद उभी केली होती. आताही आम्ही भाजपच्या सोबत आहोत असा विश्वास आहेत, असा विश्वास नागरिकांनी यावेळी श्रीमती शोभाताईंना दिला.

या दौऱ्यात भाजपाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वेळ-अमावस्या उत्सव परंपरा

## कृषीसंस्कृती, परंपरा आणि सामुदायिक एकोपा यांचा अनोखा संगम

प्रतिनिधी : कर्नाटकमहाराष्ट्र सीमाभाग तसेच मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत वेळ-अमावस्या हा पारंपरिक व धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस १९ डिसेंबर रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी मार्गशीर्ष/पौष महिन्यातील अमावस्येला ग्रामीण संस्कृतीत कुलदैवत पूजन, निसर्गपूजन व कृषीरक्षण यांचा सुंदर संगम साधला जातो.

विशेषतः कलबुर्गी, बीदर, सोलापूर, लातूर, भालकी, उदगीर, निलंगा, औसा इत्यादी परिसरात हा उत्सव अत्यंत श्रद्धेने पाळला जातो. या दिवसाच्या पूर्वतयारीसाठी पहिल्या दिवशी विविध पारंपरिक पदार्थांची तयारी केली जाते. भज्जी, आंबील, रोडगे, (विशिष्ट प्रकारची भाकर), खिचडी, वरण-फळं (पिठापासून उकडलेले पदार्थ), कानवले, खीर, पिठापासून बनवलेले दिवे असे अनेक विशिष्ट पदार्थ तयार करून पूजनासाठी सज्जता केली जाते. अनेक शेतकरी आपल्या शेतामध्ये कडब्यापासून तयार केलेली 'कोपी' (एक प्रकारची झोपडी) उभारून कोपीवर शाल पांघरून पूजनाची व्यवस्था करतात.

येणाऱ्या दिवशी सकाळी गावातील सर्वजण आपापल्या शेतात जातात. तेथे महालक्ष्मीचे पूजन करून निवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर सर्वजण



एकत्र बसून पारंपरिक पदार्थांचे भोजन करतात. कोपीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला आदराने जेवण घालण्याची परंपरा आजही मोठ्या जिव्हाळ्याने पाळली जाते. झोके खेळणे, पतंग उडवणे आदी पारंपरिक खेळांमुळे शेतशिवार आनंदाने फुलून जाते.

संध्याकाळी साधारण सहा वाजल्यानंतर शाल पांघरून सजवलेली 'डाल' (शिंदी झाडापासून विणलेली मोठी टोपली) डोक्यावर घेऊन ग्रामस्थ गावाकडे प्रस्थान करतात. गावातील महालक्ष्मीचे सामूहिक पूजन झाल्यानंतर सर्वजण आपापल्या घरी परततात. महिलावर्ग, तरुणाई व ज्येष्ठ नागरिकांमध्ये या दिवशी विशेष उत्साह पाहायला मिळतो.

पवित्र मानल्या जाणाऱ्या 'वेळ' वनस्पतीचे पूजन, घरगुती देवघरात दीपदान, हळद-कुंकू, ओटी-भरवणी अशा पारंपरिक प्रथांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जातो. महिलांमध्ये एकमेकींना कुंकू लावून मंगलाशीर्वाद देण्याची परंपरा या दिवशी विशेष रंगतदार होते.

वेळ-अमावस्या हा केवळ धार्मिक दिवस नसून गावकऱ्यांना एकत्र आणणारा, परंपरा जपणारा, आध्यात्मिक चिंतनाचा आणि सामाजिक एकता दृढ करणारा महत्त्वाचा उत्सव आहे. निसर्गाशी असलेले नाते, मातृशक्तीचे पूजन आणि पितृपरंपरेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, आणि संस्कृती टिकविण्याच्या दृष्टीने हा दिवस ग्रामीण संस्कृतीचा वारसा ठरत आहे.

# महापालिका निवडणूक आढावा बैठक ; कॉंग्रेस पदाधिकाऱ्यासह माजी नगरसेवकाचा भाजपात प्रवेश




लातूर / प्रतिनिधी :- जगातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान भाजपाला कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळे मिळालेला असून राज्यासह देशातील विविध निवडणुकांमध्ये पक्ष पदाधिकारी यांच्या एकजूट भावनेतून केलेल्या लोकसंपर्कामुळे भाजपला विजय मिळाला आहे. हीच समर्पण आणि एकजुटीची भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क आणि केलेल्या विकास कामाच्या बळावर भाजपला लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत निश्चित विजय मिळेल असा विश्वास महसूल मंत्री तथा निवडणूक प्रदेश प्रभारी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाने लातूर शहरातील औसा रोड येथे असलेल्या पाटील प्लाझा येथे सुरु केलेल्या निवडणूक कार्यालय शुभारंभ प्रसंगी घेतलेल्या आढावा बैठकीत ना. बावनकुळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री तथा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर, प्रदेश सचिव किरण पाटील, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, ॲड. शैलेश गोजमगुंडे, सुधीर धुत्तेकर, सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रविण कस्तुरे आदींची उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र राज्य सरकारने समाजातील प्रत्येक घटकांसाठी विविध योजना राबवत अनेक विकासाची कामे पूर्णत्वास नेली असल्याचे सांगत ना. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले कि नेत्यांच्या निवडणुका झालेल्या असून आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका होत आहेत. नेत्यांच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करत मोठा विजय मिळवलेला आहे. आता कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत नेते सर्वश्री ताकत पणाला लावत त्यांच्या पाठीशी उभे राहतील असा विश्वास ना. बावनकुळेनी दिला. केंद्र व राज्य सरकारने लातूर शहराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला असून या पुढे लातूरच्या विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली. मात्र हा निधी हक्काने आणण्यासाठी मनपावर भाजपचा झेंडा फडकावणे आवश्यक आहे. सरकारच्या माध्यमातून केलेली विकास कामे कार्यकर्त्यांची एकजूट आणि समर्पण भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क या बळावर भाजपचा विजय निश्चित होईल असा विश्वास व्यक्त केला. मात्र पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अति आत्मविश्वास बाळगू नये असे सांगून आपण केलेली कामे आणि आगामी काळातील लातूरच्या विकासाची संकल्पना प्रत्येक मतदारापर्यंत पोहचवावी असे आवहान ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

आगामी महापालिका निवडणुकीत आपला विजय निश्चीत असला तरी या विजयासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गाफील न राहता मतदारांशी होत असलेल्या संपर्क मोहिमेला अधिक गती द्यावी अशी अपेक्षा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त करत विरोधकांच्या खोट्या आमिषांना आणि दिशाभूल करणाऱ्या घडामोडींना हाणून पाडून आपण काय केले आणि आगामी काळात लातूरच्या विकासाला कशी गती देणार हे मतदारांना पटवून द्यावे. या निवडणुकीच्या प्रचारात आम्ही सर्वच नेते लातूर ढवळून काढत कार्यकर्त्यांना बळ देत त्यांच्या विजयासाठी जीवाचे रान करू अशी ग्वाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

बैठकीच्या प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आगामी महापालिका निवडणुक संदर्भात पक्षाने काय काय तयारी केली आहे याची माहिती देत पक्ष आणि पक्षश्रेष्टीना अपेक्षित असणारा निवडणुकीतील विजय मिळवण्यासाठी आम्ही सर्वजन एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करू असा विश्वास दिला. यावेळी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक व्यवस्थापन संदर्भात विविध सूचनाही केल्या.

या बैठकीच्या प्रारंभी कॉंग्रेसचे माजी नगरसेवक गौरव काथवटे, कॉंग्रेसच्या प्रदेश रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या उपाध्यक्षा स्वाती जाधव, सचिव दिलीप बेरूळकर, बळीराम गाडेकर, स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील यांनी भाजपात प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करत ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रवेश केलेल्यांना शुभेच्छा देऊन आगामी निवडणुकांसाठी त्यांनी समर्पण भावनेतून काम करावे असे सांगितले. बैठकीचे सूत्र संचलन सरचिटणीस प्रविण कस्तुरे यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.